**कृपया प्रसिध्दीसाठी** **24 जून 2010**

## भाजपा खासदार - आमदारांच्या गुणवत्ता संवर्धनासाठी राम नाईक यांच्या नेतृत्वाखाली नवा प्रकोष्ठ

**मुंबई, गुरुवार :** देशभरातील भाजपा खासदार व आमदारांच्या कार्यक्षमता आणि गुणवत्ता संवर्धनासाठी राष्ट्रीय अध्यक्ष श्री. नितीन गडकरी यांनी 'खासदार - आमदार विकास प्रकोष्ठ' अशा नवीन प्रकोष्ठाची स्थापना केली असून माजी केंद्रीय मंत्री श्री. राम नाईक यांची प्रकोष्ठाचे राष्ट्रीय संयोजक म्हणून नियुक्ती केली आहे.

उपलब्ध संसदीय आयुधांचा, कार्यप्रणालीचा खासदार - आमदारांनी अधिक प्रभावीरीत्या वापर केल्यास जनहिताची अनेक कामे सहज होऊ शकतात. जनप्रतिनिधीची तसेच पक्षाची प्रतिमा उंचावते. त्यामुळे देशभरातील खासदार - आमदार यांच्या कार्यक्षमतेचा विकास व्हावा या हेतूने भाजपाने हा प्रकोष्ठ निर्माण केला असून श्री. राम नाईक त्याचे राष्ट्रीय संयोजक आहेत. तीनवेळा आमदार तसेच पाचदा खासदार आणि सहा वर्षांपेक्षा अधिक काळ केंद्रीय मात्री म्हणून काम केलेल्या श्री. राम नाईक यांची संसदीय कारकीर्द लक्षवेधी ठरली. वंदेमातरम् गायन, बॉम्बे बम्बईचे मुंबई, खासदार निधी, स्तनपान प्रोत्साहन, उपनगरी रेल्वेचे प्रश्न असे अनेक विषय सभागृहाच्या माध्यमातून त्यांनी धसास लावले. भाजपा स्थापनेपासून ते राष्ट्रीय कार्यकारिणीवर आहेत. त्यामुळे देशभरातील नेत्यांची, पक्ष संघटनेची त्यांना जाण आहे. या त्यांच्या अनुभवाचा संघटनेला लाभ व्हावा यासाठी त्यांना या नव्या प्रकोष्ठाची जबाबदारी देण्यात आली आहे.

ही नवी जबाबदारी सोपवून श्री. गडकरी यांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल समाधान व्यक्त करतानाच सर्व सहकारी खासदार - आमदारांचे सहकार्य मिळून प्रकोष्ठाचा उद्देष सफल होईल, असा विश्वासही श्री. राम नाईक यांनी व्यक्त केला.

**(कार्यालय सचिव)**